# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २४/०५/२०१७

## आलापल्ली येथून अटक करण्यात आलेल्या तेंदूपत्ता ठेकेदारांकडून आणखी १ कोटी १ लाख रु. जप्त

### ◆ आतापर्यंत एकूण १ कोटी ७६ लाख रु. जप्त

दिनांक २२/०५/२०१७ रोजी रात्री ०१.३० वा. च्या दरम्यान मौजा आलापल्ली येथे विना नंबर बोलेरो चारचाकी वाहन संशयितरित्या मिळून आले होते. सदर वाहनातील इसमांची पोलीस पथकाने चौकशी व गाडीची तपासणी केली असता त्यामध्ये ७५ लाख रोकड व नक्षल पत्रके मिळून आले. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी श्री. गजानन टोम्पे यांनी अटक आरोपींची आणखी चौकशी केली असता आरोपींनी मौजा बोटलाचेरु, उपविभाग अहेरी येथे १ कोटी १ लाख रु. लपविल्याची कबूली पोलीसांना दिली. यानंतर पोलीसांनी मौजा बोटलाचेरु येथून १ कोटी १ लाख रु. जप्त केले. पोलीसांनी पहाडीया तुळशीराम तांपला (३५ वर्ष), रवि मलय्या तनकम (४५ वर्ष), नागराज समय्या पुट्टा (३७ वर्ष), या आरोपींकडून आतापर्यंत १ कोटी ७६ लाख इतकी रोकड जप्त केली आहे. आरोपींची अधिक चौकशी सुरु आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. ए. राजा यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी श्री. गजानन टोम्पे, पोलीस निरीक्षक अहेरी श्री. संजय मोरे, पोउपनि मिलन कुरकुटे, पोउपनि सुनिल इंगळे व कर्मचारी यांनी पार पाडली.

क्रांतीची भाषा वापरुन विकासाच्या नावाखाली पैसे वसूल करुन आदिवासींचे शोषण करणे हाच नक्षलचळवळीचा मुळ उद्देश असल्याचे या घटनेवरुन सिध्द झाले आहे. नक्षली कृत्यांना खतपाणी घालणाऱ्या पांढरपेशी समाजाचा खरा चेहरा आज जनतेसमोर उघड झाला आहे. जनतेने अशा लोकांच्या समाजविघातक कृत्यांचा बहिष्कार करुन लोकशाहीचे समर्थन करावे.